**Santosh Kumar, I.A.S.**
Principal Secretary to the
Governor of Maharashtra

सत्यमेव जयते

**RAJ BHAVAN**
Malabar Hill
Mumbai 400 035
Tel. : 022-2363 7671
Fax. : 022-2363 3272
Email : secy.rb-mh@nic.in

दि.१८ ऑक्टोबर २०२२

# वाहन व वाहनाचे सुटे भाग विक्री निविदा

राज्यपाल सचिव कार्यालयाचे खाली नमूद केलेले चारचाकी वाहन व इतर वाहनाचे सुटे भाग **"जसे आहे, जेथे आहे तसेच"** निकाली काढण्यासाठी इच्छुक व्यक्ती/संस्था यांच्याकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (परिशिष्ट-१)सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | वाहनाचा क्रमांक | वाहन खरेदीची तारीख | कंपनी /मॉडेल | इंधन | धावसंख्या (किलोमीटर्स) |
|---|---|---|---|---|---|
| १ | MH-01-AP-2310 | १६/०१/२०१४ | महिंद्र | डीझेल | ६०,१८९ KM. |
| २ | सोबत वाहनाचे सुटे भाग | | | | |

सदर वाहन व वाहनाचे सुटे भाग राज्यपाल सचिव कार्यालय, वाळकेश्वर मार्ग, मलबार हिल, राज भवन, मुंबई ४०००३५ येथे दि. **१७-१०-२०२२ ते ७-११-२०२२** या कालावधीत कार्यालयीन काम-काजाच्या दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत निरीक्षणाकरिता उपलब्ध असतील.

निविदा सादर करताना निविदाकाराने रु. ३,०००/- चा (मुंबई येथे देय असलेला) डिमांड ड्राफ्ट अथवा धनादेश (ACCOUNTS OFFICER, RAJ BHAVAN MUMBAI) या नावाने सिलबंद निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे. अनामत रक्कम नसलेली निविदा रद्दबातल समजण्यात येईल.

सिलबंद निविदा दिनांक **०७-११-२०२२ रोजी संध्याकाळी ५.००** वाजता सर्वांसमक्ष उघडण्यात येतील. निविदा अपेक्षित किंमतीपेक्षा कमी किंमतीची असल्यास सदर निविदा रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीने राखून ठेवलेला आहे. प्रथम उच्चतम तीन निविदाकार (Highest-1, 2, 3) वगळता सर्व अयशस्वी निविदाकारांना त्यांचे डिमांड ड्राफ्ट अथवा धनादेश परत करण्यात येईल.

ज्या यशस्वी निविदाकाराची (Highest-1) निविदा स्विकारण्यात येईल त्यांनी उर्वरित रक्कम रोखीने अथवा NEFT द्वारे कार्यालयाच्या खात्यात भरुन सदर वाहन व वाहनाचे सुटे भाग नेणे बंधनकारक राहील अन्यथा अनामत रक्कम रु. ३,०००/- जप्त करण्यात येईल व सदर वाहन व वाहनाचे सुटे भाग द्वितीय निविदाकारास (H-2) देऊ केल्या जातील.

**परिशिष्ट १ सोबत जोडलेले लिलावाद्वारे विक्रीचे नियम व अटी सर्व निविदाकारांस बंधनकारक आहेत.**

**अध्यक्ष**
**लिलाव समिती,**
**राज्यपाल सचिव कार्यालय, राज भवन**



CamScanner

# परिशिष्ट-१

(या सोबत केवळ EMD रकमेचा डिमांड ड्राफ्ट अथवा धनादेश जोडावा )

**प्रति,**

**मा. राज्यपालांचे प्रधान सचिव व अध्यक्ष, लिलाव समिती**
राज्यपालांचे सचिव कार्यालय,
वाळकेश्वर मार्ग,मलबार हिल,
राज भवन,
**मुंबई ४०००३५.**

**विषय :** **राज्यपाल सचिव कार्यालयाद्वारे लिलावाने विक्री करण्यात येणारे वाहन व वाहनाचे सुटे भाग खरेदीकरिता निविदा सादर करणेबाबत...**
**संदर्भ :** जाहिरात क्र. रा.स.का./२०२२/निर्लेखन/प्र.क्र.३६९/२८१४ दि. १८ ऑक्टोबर २०२२

**महोदय,**

माझी / आमची महिती खालील प्रमाणे असून, मी / आम्ही जाहिरात क्र. रा.स.का./२०२२/निर्लेखन/प्र.क्र.३६९/२८१४ दि. १८ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या लिलावाच्या जाहिरातीस अनुसरून राज्यपाल सचिव कार्यालयातर्फे लिलावाद्वारे विक्री करण्यात **येणारे वाहन व वाहनाचे सुटे भाग** यांच्या एकत्रित खरेदीकरिता, कार्यालयाच्या सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहून जाहिरातीत नमूद दुचाकी वाहने खरेदी करण्याकरीता माझी /आमची निविदा सादर करीत आहे.

निविदाधारकाचे नाव : ..............................

संस्थेचे नाव : ..............................

GST क्र. :(असल्यास) | | | | | | | | | | | | | | |

संपर्कासाठी पत्ता : ..............................
..............................
..............................

भ्रमणध्वनी क्र.: ..............................

धनादेश क्र. /
डिमांड ड्राफ्ट क्र.: ..............................

| **अ. क्र.** | **वाहनाचा क्रमांक** | **कंपनी /मॉडेल** | **इंधन** | **निविदेची रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| १ | MH-01-AP-2310 | महिंद्र | डीझेल | |
| २ | वाहनाचे सुटे भाग | N.A. | N.A. | |

**निविदेची रक्कम अक्षरात**......................................................................................
......................................................................................................

दिनांक : / /२०२२
ठिकाण : राज भवन, मुंबई

**निविदाकाराची स्वाक्षरी / संस्थेचा शिक्का**

# लिलावाद्वारे विक्रीचे नियम व अटी खालीलप्रमाणे

१) लिलावाद्वारे विक्री करावयाचे वाहन व वाहनाचे सुटे भाग जेथे आहे, ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत घ्यावे लागतील.

२) ज्या संस्थेचा / व्यक्तीचा देकार मंजूर करण्यात येईल अशा संस्थांनी / व्यक्तींनी वाहन व वाहनाचे सुटे भाग कार्यालयाच्या आवारातून बाहेर नेताना वाहतुकीचा, हमालीचा व इतर हाताळणीचा खर्च स्वतः सोसावयाचा आहे.

३) निर्लेखित वाहन व वाहनाचे सुटे भाग कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन मालमत्तेचे / वस्तूंचे नुकसान झाल्यास मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई संबंधित दरपत्रधारकाकडून रोखीच्या स्वरूपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.

४) दरपत्रकासोबत इसारा ठेव रक्कम (EMD) रूपये ३,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) मुंबई येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट अथवा धनादेशाद्वारे (ACCOUNTS OFFICER, RAJ BHAVAN MUMBAI) या नावाने सादर करणे अनिवार्य आहे.

५) इसारा ठेव रक्कम (EMD) रूपये ३,०००/- रोखीने अथवा NEFT द्वारे किंवा online Bank Transfer द्वारे **स्वीकारली जाणार नाही** याची नोंद घ्यावी.

६) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकृत करणे अथवा नाकारण्याचा अधिकार लिलाव समितीने राखून ठेवला आहे.

७) सदर निविदेचे नियम व अटी शिथील करण्याचे अधिकार लिलाव समितीस आहेत. या बाबत लिलाव समितीचा निर्णय अंतिम राहिल व तो दरपत्रक धारकावर बंधनकारक राहील.

८) सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

९) सदर वाहनाचा विक्री कर, पथकर (Road Tax) , वस्तू व सेवा कर इत्यादी कर भरून त्या वाहनाचे हस्तांतरण व नोंदणीबाबतची सर्व प्रक्रिया यशस्वी दरपत्रकधारकास स्वखर्चाने करावी लागेल.

१०) दरपत्रके उघडल्यानंतर कार्यालयाने अंतिम केलेल्या हातच्या किंमतीपेक्षा (अपसेट प्राईज) जास्तीत जास्त दर (Heighest rate) नमुद केलेले देकार स्वीकृत केले जाईल.

११) दरपत्रकधारकांची ईसारा ठेव (EMD) खालीलपैकी कोणत्याही प्रकरणी जप्त केली जाईल.
   (अ) दरपत्रक स्विकारण्याच्या अंतिम दिनांका नंतर दरपत्रक मागे घेतल्यास.
   (ब) दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर (मंजूर झाल्यानंतर) आवश्यक खरेदी किंमत स्वीकृतीच्या ७ दिवसापर्यंत न भरल्यास.
   (क) यशस्वी दरपत्रक धारकाने वाहन ताब्यात घेण्यास नकार दिल्यास.

१२) विहित मुदतीत रक्कम भरून वाहन व वाहनाचे सुटे भाग ताब्यात न घेतल्यास संबंधितांचा देकार रद्द ठरवून विक्री अन्य पात्र संस्थेस / व्यक्तीस करण्याचे अधिकार लिलाव समितीने राखून ठेवलेले आहेत.

१३) दरामध्ये तसेच दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पुर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार लिलाव समितीने राखून ठेवला आहे.

१४) ज्या संस्थेने / व्यक्तीने सादर केलेले लिलावाचे दर सर्वात जास्त असतील अशा यशस्वी निविदाकाराने लिलावाची संपूर्ण रक्कम दरपत्रके उघडल्यानंतर  कार्यालयाच्या बँक खात्यात ACCOUNTS OFFICER, RAJ BHAVAN MUMBAI या नावाने NEFT व्दारे बँकेत अथवा रोखीने कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहील.

१५) **दरपत्रक सादर करण्याची पध्दत** :-

(१) दरपत्रक सादर करू इच्छित असलेल्या व्यक्ती किंवा संस्थेने परिशिष्ट १ मध्ये नमूद पूर्ण माहिती भरून त्यात निविदेची कमाल रक्कम (Maximum Price) अंकात व अक्षरात नमूद करावी.

(२) दरपत्रक धारक **फर्म किंवा संस्था असल्यास** संबंधीत शासकीय विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र (उदा. शॉप ऍक्ट रजिस्ट्रेशन (गुमास्ता) किंवा जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडावे

(३) दरपत्रक धारक व्यक्ती असल्यास तिने केवळ पॅनकार्ड व EMD रकमेचा धनादेश परिशिष्ट-१ सोबत जोडावा

(४)इसारा ठेव (EMD) रूपये ३,०००/- (अक्षरी रुपये तीन  हजार मात्र) इतकी आहे. EMDच्या रकमेचा मुंबई येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट अथवा धनादेश (ACCOUNTS OFFICER, RAJ BHAVAN MUMBAI) या नावाने परिशिष्ट-१ सोबत जोडावा.

१६) परिशिष्ट-१, संबंधित कागदपत्रे व देय रकमेचा डिमांड ड्राफ्ट अथवा धनादेश मुख्य लिफाफ्यात भरून त्या लिफाफ्यावर "**वाहन व वाहनाचे सुटे भाग खरेदी करीता देकार**" असे ठळकपणे नमुद करावे. मुख्य लिफाफ्यावर दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेचे नाव, पत्ता व संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा. तसेच सदर मुख्य लिफाफा निम्नलिखित पत्त्यावर स्पीड पोस्टाने अग्रेषित करावा अथवा प्रत्यक्ष कार्यालयात आणून द्यावा.

| |
|---|
| **"वाहन व वाहनाचे सुटे भाग खरेदी करीता देकार"**<br><br>**मा. राज्यपालांचे प्रधान सचिव तथा अध्यक्ष,**<br>**वाहन लिलाव समिती**<br>**राज्यपाल सचिव कार्यालय, मलबार हिल,**<br>**वाळकेश्वर मार्ग, राज भवन, मुंबई - ४०० ०३५** |

१७) कोणतेही दर मंजुर वा रद्द करणे तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही.

१८) ज्या संस्था / व्यक्ती यांना लिलावाचे नियम व अटी मंजूर असतील अशा संस्था / व्यक्तींनी लिलावात सहभागी होण्यासाठी आपले दर बंद लिफाफ्यातून राज्यपाल सचिव कार्यालयाच्या पत्यावर कोणत्याही परिस्थीतीत दिनांक **७-११-२०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** प्राप्त होतील अशा रितीने स्वतः उपस्थित राहून किंवा रजिस्टर / स्पीड पोस्टाने पाठवावेत.

१९) **बंद लिफाफे उघडण्याची वेळ व दिनांक** :- बंद लिफाफे दि. **०७-११-२०२२ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता** लिलाव समितीच्या अध्यक्षांसमक्ष उघडण्यात येतील. (सदर वेळ व दिनांकात बदल करण्याचे अधिकार लिलाव समितीच्या अध्यक्षांनी राखून ठेवले आहेत. बंद लिफाफे उघडण्याची वेळ व दिनांक यात कार्यालयाच्या सोईस्तव बदल केला गेल्यास त्याबाबत संबंधिताना त्यांच्या दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकावर कळविण्यात येईल. या बाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही याची संबंधितानी नोंद घ्यावी.

२०) **दरपत्रक उघडण्याची पध्दत :-** दरपत्रक मुद्दा क्र. १९ मध्ये नमूद दिनांकास व वेळेत, लिलाव समितीच्या अध्यक्षांच्या दालनात उघडण्यात येतील. या वेळी दरपत्रक धारक अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे अपेक्षित आहे परंतु यापैकी कोणीही उपस्थित नसल्यास त्यांच्या अनुपस्थितीत दरपत्रके उघडण्यात येतील.

२१) वाहन व वाहनाचे सुटे भाग यांचा तपशील खालील लिंक व उपलब्ध आहे
https://drive.google.com/drive/folders/1mu_67oU33XfvCoLGSq_ONzucPvdakm9X?usp=sharing

२२) लिलावाचा विक्रीची सूचना, परिशिष्ट-१, लिलावाद्वारे विक्रीचे नियम व अटी व राज्यपाल सचिव कार्यालयाच्या https://rajbhavan-maharashtra.gov.in/ मुख्यपृष्ठ=>कागदपत्रे=>जाहिरात या संकेतस्थळावर आणि महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in/1146/Tenders मुख्य पृष्ठ=>निविदा या संकेतस्थळावर सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत उपलब्ध आहे.

*****